**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१**
web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६११११५३

क्र.उशिसं-२०१९/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती / 15999 दिनांक-१०/१२/२०१९.

**ईमेलद्वारा**

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

विषय- दुष्काळ परिस्थिती तसेच "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

संदर्भ- १ संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं-२०१९/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती/१५१५६, दि.२२/११/२०१९.
२. अॅड.अमोल मातेले, प्रवक्ता-महाराष्ट्र प्रदेश, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, मुंबई अध्यक्ष, राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेस यांचे दिनांक ०९/१२/२०१९ चे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं-२०१९/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती/१५१५६, दि.२२/११/२०१९ अन्वये प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही करणेबाबत आपणांस सुचना देण्यात आलेल्या आहेत.

तथापि अॅड.अमोल मातेले, प्रवक्ता-महाराष्ट्र प्रदेश, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, मुंबई अध्यक्ष, राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेस यांनी त्यांचे पत्र दिनांक ०९/१२/२०१९ अन्वये काही विभागीय सहसंचालक, कार्यालयाचे संकेतस्थळ गेल्या कित्येक दिवसापासून बंद आहे, तसेच काही विभागीय सहसंचालक, यांच्या संकेतस्थळावर परीक्षा शुल्कात माफी बाबतचे परिपत्रक प्रसिध्द केलेले नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आणुन दिलेले आहे.

तसेच सहसंचालक, उच्च शिक्षण कोल्हापूर विभाग यांच्या प्रशासकीय दिरंगाईमुळे कोल्हापूर विभागातील महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना परीक्षा शुल्क माफीबाबतचे परिपत्रक १० ते १२ दिवसांनी उशिरा प्राप्त झाल्याचे तसेच परिक्षा शुल्क माफीबाबतचे परिपत्रक महाराष्ट्रातील अनेक महाविद्यालयांना मिळाले नसल्यामुळे अनेक पात्र विद्यार्थी परीक्षा शुल्क माफीच्या सवलतीपासुन वंचित असल्याचे सदर पत्रात नमुद केलेले आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी संचालनालयाच्या संदर्भ क्रमांक १, दिनांक २२/११/२०१९ पत्रान्वये दिलेल्या सुचनानूसार सर्व महाविद्यालयांना परीक्षा फी माफीबाबत सुचना देऊन सदर पत्रातील विवरणपत्र अ, ब, क, व ड मधील माहिती दिनांक ३१/१२/२०१९ अखेर संचालनालयास सादर करावी.

सोबत- संदर्भिय पत्र.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत- अॅड.अमोल मातेले, प्रवक्ता-महाराष्ट्र प्रदेश, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, मुंबई अध्यक्ष, राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेस यांना माहितीस्तव.
प्रत- प्राचार्य, सर्व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालये.(कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, शारिरिक शिक्षणशास्त्र ) यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

F:\april 18\Exam Fees-19.docx

# राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस
(मुंबई शहर)

सुवर्णगाथा ५०
कायदेमंडळातील पाच दशके

**पक्ष कार्यालय :** राष्ट्रवादी भवन, क्लार्क हाऊस, रिगल सिनेमा समोर, कुलाबा, मुंबई - ४००००१.
**संपर्क कार्यालय :** सोनी अपार्टमेंट, सेंट ज्युड शाळेसमोर, ९० फिट रोड, साकीनाका, मुंबई - ४०००७२
**भ्रमणध्वनी :** 9892411498 / 9867766987 • **दुरध्वनी :** ०२२-६५२३६६००
**Email:** adv.amolmatele@gmail.com • **Twitter:** amolmatele • adv.amolmatele

**ॲड. अमोल मातेले**
**अध्यक्ष**


संदर्भ क्र. : एनसीपी/०२/१२१/ २५९/NSC

दिनांक : **०९/१२/२१९**

**प्रति,**

**माननीय सचिव**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**महाराष्ट्र राज्य,मंत्रालय मुंबई.**

**विषय:महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालय व तंत्र शिक्षण संस्थांना परीक्षा शुल्क माफी बाबतचे परिपत्रक पाठविण्याबाबत परीक्षा शुल्क माफी साठी विद्यार्थ्यांना 24 डिसेंबर 2019 पर्यंत मुदतवाढ मिळणे बाबत.....**

महोदय,

संदर्भ क्रमांक 2 नुसार उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉक्टर धनराज माने यांनी परीक्षा शुल्लक माफी बाबतचे परिपत्रक महाराष्ट्रातील सर्व विभागीय सहसंचालक पाठविले होते. महाराष्ट्रामध्ये उच्च शिक्षण विभागाचे 10 विभागीय सहसंचालक कार्यरत आहेत.

काही विभागीय सहसंचालक कार्यालयीन संकेतस्थळावर गेल्या कित्येक दिवसापासून बंद आहे.तसेच काही विभागीय सहसंचालक कार्यालयीन संकेतस्थळावर परीक्षा शुल्कात माफी बाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले नाही.

कोल्हापूर विभागाचे सहसंचालक डॉक्टर अजय साळी यांनी पत्र क्रमांक विसस/उशी/कोवि/शिष्य/ 2019/47 12 दिनांक 2/ 12/ 2019 नुसार कोल्हापूर विभागातील महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांना 4/12/2019 रोजी दुपारी एक वाजेपर्यंत विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काच्या अर्ज सादर करण्याचे आदेश दिले होते.

सहसंचालक उच्च शिक्षण कोल्हापूर विभाग यांच्या प्रशासकीय दिरंगाईमुळे कोल्हापूर विभागातील महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांना परीक्षा शुल्क माफी बाबतचे परिपत्रक 10 ते 12 दिवसांनी उशिरा प्राप्त झाले आहे.परीक्षा शुल्क माफी बाबतचे परिपत्रक महाराष्ट्रातील अनेक महाविद्यालयांना मिळाले नसल्यामुळे अनेक पात्र विद्यार्थी परीक्षा शुल्क माफीच्या सवलतीपासून वंचित आहेत.

संदर्भ क्रमांक 4 नुसार संचालनालयाचे संचालक डॉक्टर अभय वाघ यांनी दिनांक 29 नोव्हेंबर 2019 परीक्षा शुल्क माफी बाबतचे परिपत्रक महाराष्ट्रातील सर्व विभागीय सहसंचालक पाठवले होते.विभागीय संचालक तंत्रशिक्षण पुणे यांनी 3 डिसेंबर 2019 रोजी तंत्रशिक्षण संस्था व महाविद्यालयांना परीक्षा शुल्कात माफी बाबतचे परिपत्रक पाठवले होते.

महाराष्ट्रमध्ये तंत्रशिक्षण विभागाचे सहा विभागीय सहसंचालक कार्यरत आहे. मुंबई,नाशिक,अमरावती,p नागपूर व औरंगाबाद या पाच विभागीय सहसंचालक कार्यालय संकेतस्थळावर परीक्षा शुल्कात माफी बाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले नाही तरी या पाच विभागीय सहसंचालक तंत्रशिक्षण यांनी परीक्षा शुल्कात माफी बाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले नाही.तरी या पाच विभागीय सहसंचालक तंत्रशिक्षण यांनी परीक्षा शुल्लक माफी बाबतचे परिपत्रक तंत्रशिक्षण संस्था व महाविद्यालयांना पाठवले आहे का याबाबत चौकशी करावी?

संचालक तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य व सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई, पुणे,नाशिक,औरंगाबाद, अमरावती व नागपूर यांच्या प्रशासकीय दिरंगाईमुळे महाराष्ट्रातील सर्व तंत्रशिक्षण संस्था महाविद्यालय यांना परीक्षा शुल्क माफी बाबतचे परिपत्रक 10 ते 12 दिवसांनी उशिरा प्राप्त झाली आहे.

परीक्षा शुल्क माफी बाबतचे परिपत्रक महाराष्ट्रातील आणि तंत्रशिक्षण संस्था महाविद्यालय मिळाले नसल्यामुळे अनेक पात्र विद्यार्थी परीक्षा शुल्क माफी च्या सवलतीपासून वंचित आहेत.तरी सर्व बाबींचा विचार करून परीक्षा शुल्क माफी साठी विद्यार्थ्यांना 24 डिसेंबर 2019 पर्यंत मुदतवाढ मिळावी ही आपणास नम्र विनंती.

**आपलाच,**

**ॲड.अमोल मातेले**
**प्रवक्ता-महाराष्ट्र प्रदेश,राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी.**
**मुंबई अध्यक्ष,राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेस.**

राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेस
अमोल मातेले
(अध्यक्ष-मुंबई प्रदेश)
क्लार्क हाऊस, नाथालाल पारेख मार्ग,
रिगल सिनेमा समोर, कुलाबा, मुंबई-४००००१.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१
web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं-२०१९/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती/15156 दिनांक-२२/११/२०१९ 22 NOV 2019
ईमेलद्वारा/अतितात्काळ

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

विषय- दुष्काळ परिस्थिती तसेच "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

संदर्भ- १ शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय, क्र.एफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दिनांक १८/१०/१९९३
२ महसुल व वन विभाग शासन निर्णय, क्र.एससीवाय-२०१९/प्र.क्र.२२०/म-७, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१९.
३ महसुल व वन विभाग शासन निर्णय, क्र.सीएएस २०१९/प्र.क्र.१९१/म-३, दिनांक १८ नोव्हेंबर २०१९.
४ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.शुल्क-५२१९/प्र.क्र.३११/मशि-२, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१९.

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठ परीक्षा व परीक्षा मंडळे यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना लागू केली आहे. यामध्ये अकृषी विद्यापीठाकडून घेण्यात येणा-या परीक्षांचा समावेश आहे. आता महसुल व वन विभागाने संदर्भाधिन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये जून ते सप्टेंबर या कालावधीत पर्जन्य तूट व अनुषांगिक बाबीमुळे प्रभावित झालेल्या आंबेजोगाई, जि.बीड व परांडा, जि.उस्मानाबाद या दोन तालुक्यामध्ये दुष्काळ घोषित करुन काही सवलती लागू केलेल्या आहेत. तसेच, संदर्भाधिन क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये राज्यात माहे ऑक्टोंबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे झालेल्या अवेळी पावसामुळे राज्यातील ३४ जिल्हयातील ३२५ तालुक्यांमध्ये शेतीपिकांचे व बहुवार्षिक पिकांचे नुकसान झालेल्या आपदग्रस्त शेतक-यांना मदत व सवलतीमंध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची सवलत लागू केलेली आहे. यास्तव सदर दुष्काळी परिस्थती व आपदग्रस्त तालुक्यांमधील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा माफीसंबंधी संदर्भाधिन क्रमांक-१ येथील शासन निर्णयातील तरतुदीनूसार तात्काळ कार्यवाही करावयाची आहे. त्यानुसार आपल्या अधिनस्त विद्यापीठ/महाविद्यालयांना खालीलप्रमाणे सुचना देण्यात याव्यात.

१ संदर्भ क्र.१ येथील १८ ऑक्टोबर, १९९३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील विद्यार्थी व सवलतीस पात्र असणारे शेतीपीकांच्या नुकसान झालेल्या शेतक-यांचे पाल्य यांच्याकडून महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदनपत्रे विद्यापीठाकडे संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या प्रमाणपत्रावर साक्षांकित करुन पाठवावे.



Scanned by CamScanner

२ सद्यस्थितीत विद्यापीठांचे पहिले शैक्षणिक सत्र संपलेले असल्याने महाविद्यालयात दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील पात्र विद्यार्थी व शेतीपीकांच्या नुकसान झालेल्या शेतक-यांचे पाल्य शिक्षण घेत असल्यास सदर लाभार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी भरलेल्या रकमेची प्रतिपुर्ती करण्यासाठी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी विद्यापीठ/महाविद्यालये यांच्याकडून माहिती संकलीत करुन व रक्कम परिगणना करुन सदर रकमेचा प्रस्ताव संचालनालयास सादर करावा.

३ विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, यांनी महाविद्यालयाकडून/विद्यापीठाकडून आलेल्या माहितीची तपासणी करुन आवश्यक रकमेची माहिती संचालनालयाकडे सोबतच्या विवरणपत्र-अ,ब,क,ड मध्ये सादर करावी. सदरची माहिती सादर केल्यानंतर संचालक स्तरावरुन सहसंचालक कार्यालयांना सदर योजनेसाठी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल व सहसंचालक स्तरावरुन संबंधित रकमेची प्रतिपुर्ती करण्यात येईल.

४ कोणत्याही परिस्थीतीत दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील विद्यार्थी व सवलतीस पात्र असणारे शेतीपीकांच्या नुकसान झालेल्या शेतक-यांचे पाल्य सदर योजनेपासुन वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

५ ही परीक्षा शुल्क माफीची योजना राज्याचा अधिवासी असलेल्या व रुपये ८.०० लाख या मर्यादेपर्यंत कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा असलेल्या, दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील विद्यार्थी व सवलतीस पात्र असणारे शेतीपीकांच्या नुकसान झालेल्या शेतक-यांचे पाल्य यांना लागू राहील.

**६ ही सवलत खालील विद्यार्थ्यांना लागू असणार नाही-**

अ. ज्या विद्यार्थ्यांना शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १०० टक्के परीक्षा शुल्क माफीची सवलत उपलब्ध आहे.

ब. जे विद्यार्थी त्याच परीक्षेस दुस-यांदा बसले असतील.

क. जे विद्यार्थी बहिस्थ म्हणून नोंदले असतील.

ड. ज्या विद्यार्थ्यांचे पालक शहरात प्रत्यक्ष राहतात, नोकरी-धंदा करतात, परंतु त्यांच्या नांवे गावी शेत जमिन आहे अशा विद्यार्थ्यांना.

ऑक्टोंबर २०१९ मधील अवेळी पावसामुळे मोठया प्रमाणात पिकांचे नुकसानीमुळे बाधित झालेल्या तालुक्यांची नावाची यादी सोबत जोडली आहे.

प्रस्तुत माहिती दिनांक २५/११/२०१९ पर्यंत संचालनालयास सादर करावी.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत-सर्व कुलसचिव, अकृषि विद्यापीठे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
प्रत- मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत- प्राचार्य, सर्व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालये.(कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, शारिरिक शिक्षणशास्त्र ) यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

F:\april 18\Exam Fees-19.docx

Scanned by CamScanner

विवरणपत्र-अ

दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यांमधील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तपशीलाचे विवरणपत्र

| अ.क्र. | दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील रहिवाशी असलेल्या ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्तीसाठी आवश्यक रक्कम (रुपये) | ज्या विद्यार्थ्यांनी फी न भरता प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्तीसाठी आवश्यक रक्कम (रुपये) | एकूण विद्यार्थी संख्या | एकूण प्रतिपुर्तीची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

विवरणपत्र-ब

शेतीपिकाच्या नुकसान झालेल्या शेतक-यांच्या पाल्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तपशीलाचे विवरणपत्र

| अ.क्र. | "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या भागातील रहिवाशी असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्तीसाठी आवश्यक रक्कम (रुपये) | ज्या विद्यार्थ्यांनी फी न भरता प्रमाणपत्र दाखले केले आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्तीसाठी आवश्यक रक्कम (रुपये) | एकूण विद्यार्थी संख्या | एकूण प्रतिपुर्तीची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

विवरणपत्र-क

दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यांमधील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तपशीलाचे विवरणपत्र

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | दुष्काळग्रस्त भागातील रहिवाशी असलेल्या विद्यार्थ्यांचे नाव | दुष्काळग्रस्त तालुक्याचे नाव | प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे नाव | परीक्षा शुल्काची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

विवरणपत्र-ड

शेतीपिकाच्या नुकसान झालेल्या शेतक-यांच्या पाल्यांना महाविद्यालयीन परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | शेतीपिकाच्या नुकसान झालेल्या शेतक-यांच्या पाल्यांचे नाव | ऑक्टोबर २०१९ मधील अवेळी पावसामुळे मोठया प्रमाणात पिकांचे नुकसानीमुळे बाधित झालेल्या तालुक्याचे नाव | प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे नाव | परीक्षा शुल्काची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

स्वाक्षरी

F:\april 18\Exam Fees-19.docx

Scanned by CamScanner

शासन निर्णय क्रमांक-: सीएलएस-२०१९/प्र.क्र.१९१/म -३, दिनांक---------- चे परिशिष्ट-अ

## ऑक्टोबर,२०१९ मधील अवेळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसानीमुळे बाधित झालेले तालुके

| अ.क्र. | जिल्हा | बाधित तालुके (नांव) | बाधित तालुके (संख्या) |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | ठाणे, कल्याण, अंबरनाथ, मुरबाड, शहापूर, भिवंडी | ०६ |
| २ | पालघर | पालघर, डहाणू, तलासरी, वसई, वाडा, जव्हार, मोखाडा, विक्रमगड | ०८ |
| ३ | रायगड | अलिबाग, मुरूड, पेण, खालापूर, उरण, कर्जत, पनवेल, माणगाव, तळा, पाली/सुधागड, रोहा, महाड पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा | १५ |
| ४ | रत्नागिरी | रत्नागिरी, राजापूर, लांजा, चिपळूण, संगमेश्वर, गुहागर, दापोली, खेड, मंडणगड | ०९ |
| ५ | सिंधुदुर्ग | कणकवली, मालवण, देवगड, वैभववाडी, सावंतवाडी, वेंगुर्ला, दोडामार्ग, कुडाळ | ०८ |
| ६ | धुळे | धुळे, साक्री, शिंदखेड, शिरपूर | ०४ |
| ७. | जळगांव | अमेळनेर, चोपडा, एरंडोल, धरणगाव, पारोळा, जळगाव, भुसावळ, बोदवड, यावल, रावेर, मुक्ताईनगर, भडगाव, चाळीसगाव, जामनेर, पाचोरा | १५ |
| ८ | नाशिक | मालेगाव,सटाणा, नांदगाव, कळवण, दिंडोरी, देवळा, सुरगाणा, नाशिक, इंगतपुरी, पेठ, त्र्यंबकेश्वर, निफाड, चांदवड, येवला सिन्नर | १५ |
| ९ | नंदुरबार | नंदुरबार, नवापूर, शहादा, अक्राणी | ०४ |
| १० | कोल्हापूर | करवीर, कागल, राधानगरी, गगणबावडा, पन्हाळा, शाहूवाडी, हातगणंगले, शिरोळ, गडहिंग्लज, आजरा, भुदरगड, चंदगड | १२ |
| ११ | सातारा | कराड, पाटण, वाई, जावळी महाबळेश्वर, खंडाळा, सातारा, कोरेगाव, खटाव, फलटण, माण | ११ |
| १२ | सांगली | कवठेमहाकाळ, जत, तासगाव, आटपाडी, पलुस, खानापूर, कडेगाव, वाळवा, शिराळा, मिरज | १० |
| १३ | पुणे | मुळशी, भोर, मावळ, वेल्हे, जुन्नर, खेड, आंबेगाव, शिरूर, बारामती, दौंड, पुरंदर | ११ |
| १४ | अहमदनगर | रहाता, नेवासा, कोपरगाव, कर्जत, श्रीगोंदा, संगमनेर, अकोले, श्रीरामपूर, शेवगाव, जामखेड, नगर, पाथर्डी, पारनेर, राहुरी | १४ |
| १५ | सोलापूर | द. सोलापूर, उ. सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ, सांगोला, बार्शि, म्हाडा | ०७ |
| १६ | औरंगाबाद | औरंगाबाद, पैठण, फुलंब्री, वैजापूर, गंगापूर, खुलताबाद, सिल्लोड, कन्नड, सोयगाव | ०९ |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | जालना | जालना, बदनापूर, भोकरदन, जाफ्राबाद, अंबड, परतुर, मंठा, घनसावगी | ०८ |
| १८ | बीड | बीड, माजलगाव, गेवराई, वडवणी, अंबेजोगाई, केज, परळी | ०७ |
| १९ | लातुर | लातुर, औसा, रेणापूर,निलंगा, शिरूर अनंतपाळ, उदगीर, अहमदपूर, जळकोट, देवणी, चाकूर | १० |
| २० | उस्मानाबाद | उस्मानाबाद, तुळजापूर, उमरगा, लोहारा, भुम, परांडा, वाशी, कळंब | ०८ |
| २१ | हिंगोली | हिंगोली, कळमनुरी, वसमत,औंढा-नागनाथ, सेनगाव | ०५ |
| २२ | परभणी | परभणी, सेलु, मानवत, गंगाखेड, जितुर, पुर्णा, सोनपेठ, पाथरी, पालम | ०९ |
| २३ | नांदेड | नांदेड, अर्धापूर, मुदखेड, कंधार, लोहा, देगलुर, मुखेड, नायगाव, बिलोली, धर्माबाद, किनवट, माहुर, हिमायतनगर, हदगांव, भोकर, उमरी | १६ |
| २४ | अमरावती | अमरावती, भातकुली, नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे, मोर्शी, वरूड, चांदुर बाजार, तिवसा, धारणी, अचलपूर, दर्यापूर, अंजनगाव सुर्जी, चिखलदरा | १४ |
| २५ | अकोला | अकोट, तेल्हार, बाळापूर, पातुर, अकोला, बार्शिटाकळी, मुर्तिजापूर | ०७ |
| २६ | यवतमाळ | यवतमाळ, कळंब, घाटंगी, राळेगांव, दारव्हा,, नेर, आर्णी, बाभुळगांव, पुसद, दिग्रस, उमरखेड, महागांव, पांढरकवडा, वणी, मारेगांव, झरी | १६ |
| २७ | वाशिम | वाशिम, मालेगांव, रिसोड, मंगरूळपीर, मानोरा, कारंजा | ०६ |
| २८ | बुलढाणा | बुलढाणा, मलकापुर,चिखली, मोताळा, मेहकर, लोणार, सिंदखेड राजा, देऊळगाव राजा, खामगाव, शेगांव, संग्रामपुर, नांदुरा, जळगांव जामोद | १३ |
| २९ | वर्धा | वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, हिंगणघाट, समुद्रपूर | ०६ |
| ३० | नागपूर | रामटेक, उमरेड | ०२ |
| ३१ | चंद्रपूर | चंद्रपूर, बल्लारपूर, मुल, सावली, वरोरा, भद्रावती, चिमूर, नागभिड, सिंदेवाही, ब्रम्हपूर, राजुरा, कोरपना, गोंडपिंपरी, पोंभुर्णा | १४ |
| ३२ | भंडारा | भंडारा, मोहाडी, तुमसर, पवनी, साकोली, लाखनी, लाखांदुर | ०७ |
| ३३ | गोंदिया | गोंदिया, गोरेगाव, तिरोडा, अर्जुनी-मोर, देवरी, सालेकसा, सडक-अर्जुनी, आमगाव | ०८ |
| ३४ | गडचिरोली | गडचिरोली, चामोर्शी, धानोरा, मुलचेरा, वडसा, आरमोरी, करखेडा, कोरची, अहेरी, भामरागड, सिरोंचा | ११ |
| | | एकूण तालुके | ३२५ |

Scanned by CamScanner

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/परीक्षा शुल्क/3232 दिनांक : २५.११.२०१९

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - दुष्काळ परिस्थिती तसेच "क्यार" व "महा" चक्रि वादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत...**

संदर्भ : - १. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय, क्र. एएफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दि. १८.१०.१९९३.
२. महसूल व वन विभाग शासन निर्णय, क्र. एससीवाय-२०१९/प्र.क्र २२०/म-७, दि. ३१.१०.२०१९.
३. महसूल व वन विभाग शासन निर्णय, क्र. एससीवाय-२०१९/प्र.क्र १९१/म-३, दि. १८.११.२०१९.
४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. शुल्क-५२१९/प्र.क्र ३११/मशि-२, दि. २१.११.२०१९.
५. मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती/१५१५६ दि.२२.११.२०१९.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, दुष्काळ परिस्थिती तसेच "क्यार" व "महा" चक्रि वादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबतचे मा. संचालनालयाचे संदर्भिय पत्र क्र. ५ च्या पत्राचे अवलोकन करावे. **त्यासोबत जोडलेल्या विवरणपत्र - अ, ब, क व ड ची अचूक माहिती तात्काळ संबंधित कर्मचाऱ्यासोबत हार्ड कॉपी आणि सॉफ्ट कॉपी द्वारे मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे कार्यालयात तपासून हस्तपोहोच जमा करावी. सदर माहिती आवक-जावक विभागामध्ये जमा केल्यास अथवा स्पीड पोस्ट/कुरिअर/टपालाद्वारे पाठविल्यास सदर महाविद्यालयाची/संस्थेची/विद्यापीठाची माहिती विचारात घेतली जाणार नाही.सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता सदर माहिती दि. ३०.११.२०१९ पर्यंतच अतितात्काळ हस्तपोहोच जमा करावी. त्यानंतर सदर माहिती आवक-जावक विभागामध्ये जमा केल्यास अथवा स्पीड पोस्ट/कुरिअर/टपालाद्वारे पाठविल्यास सदर महाविद्यालयाची/संस्थेची/विद्यापीठाची माहिती विचारात घेतली जाणार नाही. कृपया सॉफ्ट कॉपीमधील सर्व माहिती फक्त मायक्रोसॉफ्ट एक्सेल फॉरमॅट मध्ये Times New Roman या इंग्लिश फॉन्टमध्येच जमा करावी. अन्य फॉरमॅट/ फॉन्टमधील माहिती विचारात घेतली जाणार नाही.**

आपला विश्वासू

(डॉ. संजय जगताप)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

सोबत — मा. संचालनालयाचे संदर्भिय पत्र.

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/क्यारवमहानुकसानग्रस्त/ 3358 दिनांक : १२.१२.२०१९

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - दुष्काळ परिस्थिती तसेच "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत...**

संदर्भ : - १. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय, क्र. एएफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दि. १८.१०.१९९३.
२. महसूल व वन विभाग शासन निर्णय, क्र. एससीवाय-२०१९/प्र.क्र २२०/म-७, दि. ३१.१०.२०१९.
३. महसूल व वन विभाग शासन निर्णय, क्र. एससीवाय-२०१९/प्र.क्र १९१/म-३, दि. १८.११.२०१९.
४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. शुल्क-५२१९/प्र.क्र ३११/मशि-२, दि. २१.११.२०१९.
५. मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती/१५१५६ दि.२२.११.२०१९.
६. प्रस्तुत कार्यालयाचे पत्र क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/पूरग्रस्त/३२३२ दि. २५.११.२०१९.
७. मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती/१२२७६ दि.२६.११.२०१९.
८. मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती/१५९९९ दि.१०.१२.२०१९.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, **दुष्काळ परिस्थिती तसेच "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबतचे प्रस्तुत कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. ६ नुसार** अद्यापही महाविद्यालयांची माहिती अप्राप्त आहे.

**तसेच संदर्भिय पत्र क्र. ५, ६, ७ व ८ च्या पत्राचे अवलोकन करावे.** त्यासोबत जोडलेल्या विवरणपत्र - अ, ब, **क व ड ची अचूक माहिती तात्काळ संबंधित** कर्मचाऱ्यासोबत हार्ड कॉपी आणि सॉफ्ट कॉपी द्वारे मा. सहसंचालक, उच्च **शिक्षण, पुणे विभाग, पुणे कार्यालयात तपासून हस्तपोहोच जमा करावी. सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता सदर माहिती दि. २६.१२.२०१९ पर्यंतच अतितात्काळ हस्तपोहोच जमा करावी.** जेणेकरुन सदर प्राप्त माहिती मा. संचालनालयास वेळेत **सादर करता येईल. त्यानंतर सदर माहिती आवक-जावक विभागामध्ये जमा केल्यास** अथवा स्पीड पोस्ट/कुरिअर/टपालाद्वारे पाठविल्यास सदर महाविद्यालयाची/**संस्थेची/विद्यापीठाची माहिती विचारात घेतली जाणार नाही.**

(डॉ. संजय जगताप)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

सोबत -- मा. संचालनालयाचे संदर्भ क्र. ८ पत्र.